सकाळ

# ‘रवळनाथ’ सहकारातील आशेचे बेट

## डॉ. जगन्नाथ पाटील : गडहिंग्लजमधील प्रधान कार्यालयास भेट

**सकाळ वृत्तसेवा**

गडहिंग्लज, ता. ३ : देशात अनेक सहकारी, खासगी वित्तीय संस्था कंपन्या धडाधड बंद पडत असतानाच्या काळात केवळ सचोटी, पारदर्शी कारभार व सामाजिक बांधिलकीमुळे रवळनाथचा लौकीक देशभर पसरला आहे. किंबहुना रवळनाथ म्हणजे देशाच्या सहकारातील आशेचे बेटच आहे. म्हणूनच रवळनाथची कामगिरी जगभर पोहचायला हवी व त्यासाठी आपण पुढाकार घेऊ, अशी ग्वाही जागतिक स्तरावरचे शिक्षणतज्ज्ञ डॉ. जगन्नाथ पाटील यांनी दिली.



**गडहिंग्लज : रवळनाथ संस्थेला भेटीप्रसंगी बोलताना डॉ. जगन्नाथ पाटील. शेजारी एम. एल. चौगुले व संचालक.**

येथील रवळनाथ को-ऑप फायनान्स सोसायटीचे प्रधान कार्यालय व ज्ञानदीप प्रबोधिनीच्या झेप व इंटेट करिअर ॲकॅडमीच्या भेटीप्रसंगी ते बोलत होते. संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांच्या हस्ते डॉ. पाटील यांचा सत्कार झाला. ते म्हणाले, ‘कोणत्याही संस्थेत केवळ २० टक्के लोकच झपाटल्यासारखे काम करतात. त्यांच्यामुळे संस्था मोठ्या होतात. त्यामुळे सकारात्मक व्यक्ती व संस्थांची संख्या चक्रवाढ पद्धतीने वाढायला हवी.’ संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी स्वागत केले. समृद्धी घेजी यांनी सूत्रसंचालन केले. सीईओ दत्तात्रय मायदेव यांनी आभार मानले. प्राचार्य प्रशांत पालकर, प्रा. विजयकुमार घुगरे, डॉ. दत्ता पाटील, डॉ. किरण पोतदार, महेश मजती, मीना रिंगणे, रेखा पोतदार, विजय आरबोळे, मनोहर गुरबे, संदीप कागवाडे, संदीप पाटील, शिवानंद घुगरे, सागर माने, बाबासाहेब मार्तंड उपस्थित होते.

### चालते बोलते विद्यापीठच

संस्थापक चौगुलेंच्या कर्तृत्वामुळेच रवळनाथ व झेपसारखी आदर्श संस्था उभारली आहे. चौगुले म्हणजे चालते बोलते विद्यापीठच आहे. त्यांचे व या संस्थांचे काम केवळ देशातच नव्हे तर जगभर पोहचवण्यासाठी आपण प्रयत्न करू, असे डॉ. पाटील म्हणाले.